|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/०६/ प्रवेश व पात्रता / २९३ /२०२३ दि.३०.११.२०२३

## परिपत्रक क्र. ४७ /२०२३

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा.प्राचार्य / संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा / परिसंस्था / विभाग यांचे मा.संचालक/ विभागप्रमुख.

विषय -: कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ -: १.मा.प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र जा.क्र.युएनआय/(९५/२३)/विशि-१ /१४९१८, दि.१७.११.२०२३.
२.क.ब.चौ.उ.म.वि चे पत्र जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/६८/ २०२१, दि.१२.०८.२०२१.
३.क.ब.चौ.उ.म.वि चे पत्र जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/७३/२०२१, दि.१७.०८.२०२१.
४. क.ब.चौ.उ.म.वि चे पत्र जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/१७१/२०२१, दि.२४.१२.२०२१.

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरून, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.२,३ आणि ४ च्या पत्रांन्वये सर्व संलग्नीत महाविद्यालये / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा तसेच विभागांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात कळविण्यात आले होते.

आता पुनश्च मा.प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे संदर्भीय पत्र क्र.०१ प्राप्त झाले आहे. सदरच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विद्यापीठाने यापुर्वीच कार्यवाही केलेली आहे.

तेव्हा आपण वरील संदर्भीय पत्र क्र.१ नुसार कार्यवाही करावी आणि पत्रातील मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केल्यानुसार सन २०२०-२०२१ व २०२१ - २०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये विषयांकित प्रकरणी किती विद्यार्थांना लाभ दिलेला आहे याबाबलची वर्षनिहाय माहीती संचालयनालय कार्यालयाने मागीतलेली असल्याने सदरची माहीती फी माफ दिलेल्या रक्कमेसह दिनांक १५.१२.२०२३ पर्यंत **boskbcnmu.jalgaon@gmail.com** वर पाठवावी.या व्यातिरीक्त त्यानंतरही शैक्षणिक वर्ष २०२२ - २०२३ व. २०२३ - २०२४ करीता सवलतीचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींची माहिती सादर करावी ही विनंती.

आपला विश्वासू,

रा.चि.ठाकरे
**सहायक कुलसचिव**
(अति.कार्यभार)
प्रवेश, पात्रता आणि अभ्यासमंडळ
विभाग

**सोबत :-** दि.१७.११.२०२३., दि.१२.०८.२०२१.,दि.१७.०८.२०२१., दि.२४.१२.२०२१., च्या पीडीएफ.

प्रत माहितीसाठी :- १) मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३) मा.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
५) मा.वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
६) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(९५/२३)/विशि-१ / ७४९१८ दि. १७ नोव्हेंबर, २०२३

17 NOV 2023

प्रति,

मा.कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगानेकार्यवाही करणेबाबत.**

संदर्भ शासन पत्र क्रमांक बैठक २०२१/प्र.क्र.१३७/विशि-३ दि.३० जून, २०२३

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे आपणास पाठविलेले व या संचालनालयास पृष्टांकितकेलेले पत्र कृपया पहावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येतेकी, दि.२८ जून, २०२१ रोजीतत्कालिन मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मा.कुलगुरु, यांनी दिलेल्या सहमतीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना खालील मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

१. **ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे आई/वडील/पालक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे पदवी/पदव्युत्तर शिक्षण पूर्णहोईपर्यंतचेसंपुर्ण फी माफ करण्यात यावे.**

२. अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबीसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात यावे.

३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

४. विद्यार्थ्यांव्दारे वसतिगृहाचा उपयोगकरण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

५. विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित महाविद्यालयात देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही. त्या बाबीसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

६. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

७. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ टप्प्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. तसेच शुल्क थकीत असेलतर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानहोणार नाही याची दक्षता घ्यावी.

**८. सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये विषयांकित प्रकरणी किती विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे, याबाबतची वर्षनिहाय माहिती या संचालनालयास पाठवावी.**

प्रस्तूत प्रकरणी यापूर्वी शासनाने वेळोवेळी अवगत केलेले आहे, तथापि या निदेशानुसार अनुपालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमात खंड पडू नये यास्तव शैक्षणिक हित विचारात घेऊन शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यास्तव विद्यापीठांना अवगत करण्यात येत आहे.

**(डॉ.शैलेन्द्र देवळाणकर)**
प्र.शिक्षणसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत- माहितीस्तव सादर**

१. मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२ यांचे स्वीय सहाय्यक

२. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**प्रवेश व पात्रता विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/ ६८ / २०२१ दि. १२.०८.२०२१

**प्रति,**

क.ब.चौ.उ.म.वि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था यांचे
मा. प्राचार्य/संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग
यांचे मा.संचालक / विभागप्रमुख यांना..

**विषय -:** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात..

**महोदय / महोदया,**

मा.शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. विधी-५०२०/प्र.क्र. ६८/सीईटीसेल/७६५२ दि. १ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रा सोबत मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्र. बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक ३०.०६.२०२१ रोजीच्या पत्रात क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने खालील प्रमाणे निर्णय घेतले आहे.

१. ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होई पर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात येत आहे.सदरची सवलत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता लागू राहील.त्यासाठी विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक (केवळ आई /वडील नसल्यास) यांचा कोविडमुळे मयत झाल्याचा दाखला महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभांग यांचे मार्फत प्रवेश व पात्रता विभागाकडे सादर करावेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

*** फक्त शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता ***

| अ.क्र. | फी घेण्यासंदर्भात विवरण | माफ करण्यात आलेल्या शुल्काची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | जिमखाना शुल्क **(Gymkhana Fee)** | १०० % |
| २. | आपत्कालीन व्यवस्थापन शुल्क **(Disaster Management Fee)** | |
| ३. | विद्यार्थी उपक्रम शुल्क **(Student Activities Fee)** | |
| ४. | गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी **(Poor student Aid Fund)** | |
| ५. | अश्वमेध शुल्क **(Ashwemedh Fee)** | |
| ६. | स्नेह संमेलन शुल्क **(Gathering Fee)** | |
| ७. | व्यक्तीमत्व विकास व व्यवसाय रोजगार मार्गदर्शन शुल्क **(Personality Development & Career Guidance Fee)** | |

.. २ ..

| | | |
|---|---|---|
| ८. | ग्रंथालय शुल्क **( Library Fee)** | ५० % |
| ९. | प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान) **(Laboratory Fee (Science )** | |

**टिप :-** वरील तक्यात नमूद केलेल्या फी व्यतिरिक्त इतर सर्व फी विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे आकारण्यात यावी.

३. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

तेव्हा, उपरोक्त प्रमाणे नोंद घेवून सदरची बाब आपल्या महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा / विभागांमध्ये मधील विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि अधिनस्थ अध्यापक, कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University ★ Jalgaon ★ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**

प्रवेश, पात्रता आणि अभ्यास मंडळ विभाग

**<u>प्रत माहितीसाठी</u> :-**

१.मा.प्रभारी कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

२.मा. प्रभारी प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

३.मा. प्रभारी कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

४.मा. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

५.मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. **( दै.वृत्तपत्रातून प्रसिध्दीसाठी )**

६.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/७२/२०२१ दि. १७.०८.२०२१

## * सुधारीत पत्र *

**प्रति,**
क.ब.चौ.उ.म.वि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था यांचे
मा. प्राचार्य/संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग
यांचे मा.संचालक / विभागप्रमुख यांना..

**विषय -:** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात..

**महोदय / महोदया,**

मा.शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. विधी-५०२०/प्र.क्र. ६८/सीईटीसेल/७६५२ दि. १ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रा सोबत मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्र. बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक ३०.०६.२०२१ रोजीच्या पत्रात क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने खालील प्रमाणे निर्णय घेतले आहे.

१. ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होई पर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात येत आहे.सदरची सवलत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता लागू राहील.त्यासाठी विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक (केवळ आई /वडील नसल्यास) यांचा कोविडमुळे मयत झाल्याचा दाखला महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांचे मार्फत प्रवेश व पात्रता विभागाकडे सादर करावेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

*** फक्त शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता ***

| अ.क्र. | फी घेण्यासंदर्भात विवरण | माफ करण्यात आलेल्या शुल्काची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | जिमखाना शुल्क (**Gymkhana Fee**) | १०० % |
| २. | आपत्कालीन व्यवस्थापन शुल्क (**Disaster Management Fee**) | |
| ३. | विद्यार्थी उपक्रम शुल्क (**Student Activities Fee**) | |
| ४. | गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी (**Poor student Aid Fund**) | |
| ५. | अश्वमेध शुल्क (**Ashwemedh Fee**) | |
| ६. | स्नेह संमेलन शुल्क (**Gathering Fee**) | |
| ७. | व्यक्तीमत्व विकास व व्यवसाय रोजगार मार्गदर्शन शुल्क (**Personality Development & Career Guidance Fee**) | |

.. २ ..

| | | |
|---|---|---|
| ८. | ग्रंथालय शुल्क **( Library Fee)** | |
| ९. | प्रयोगशाळा शुल्क **(Laboratory Fee )**<br>**( सर्व विद्याशाखेंतर्गत येणा-या प्रात्यक्षिक विषयांसाठी )** | ५० % |

**टिप :-** वरील तक्यात नमूद केलेल्या फी व्यतिरिक्त इतर सर्व फी विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे आकारण्यात यावी.

३. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

तेव्हा, उपरोक्त प्रमाणे नोंद घेवून सदरची बाब आपल्या महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा / विभागांमध्ये मधील विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि अधिनस्थ अध्यापक, कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**

प्रवेश, पात्रता आणि अभ्यास मंडळ विभाग

**प्रत माहितीसाठी :-**

१.मा.प्रभारी कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

२.मा. प्रभारी प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

३.मा. प्रभारी कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

४.मा. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

५.मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

६.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/८१/ २०२१ दि.२२.१२.२०२१
दि.२४.१२.२०२१

प्रति,
क.ब.चौ.उ.म.वि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था यांचे
मा. प्राचार्य/संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग
यांचे मा.संचालक / विभागप्रमुख यांना..

विषय -:शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात मुद्या क्र.०१ च्या निर्णयांत करण्यात आलेल्या सुधारीत बदलाबाबत..

संदर्भ -: क.ब.चौ.उ.म.वि चे पत्र जा.क्र. कबचौउमवि/६/प्रवेश पात्रता/७३/ २०२१, दि.१७.०८.२०२१.

महोदय / महोदया,

आपणास विदितच आहे की, आपणांस उपरोक्त संदर्भीय पत्रांन्वये क.ब.चौ.उ.म.वि शी संलग्नीत महाद्यिालयांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये सवलत देण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे.

तद्नंतर दि.२४.११.२०२१ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन परीषदेच्या सभेत **ठराव क्र.व्य.प.सी-१९५/२०२१, दि.२४.११.२०२१** नुसार निर्णय क्र. १ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

*** पुर्वीचा निर्णय ***

१. ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होई पर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात येत आहे.सदरची सवलत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ **करीता** लागू राहील.त्यासाठी विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक (केवळ आई /वडील नसल्यास) यांचा कोविडमुळे मयत झाल्याचा दाखला महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांचे मार्फत प्रवेश व पात्रता विभागाकडे सादर करावेत.

*** मा.व्य.प.सी-१९५/२०२१ दि.२४.११.२०२१ अन्वये घेण्यात आलेला निर्णय ***

ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होई पर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात येत आहे.सदरची सवलत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ **पासून** लागू राहील.त्यासाठी विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील / पालक (केवळ आई /वडील नसल्यास) यांचा कोविडमुळे मयत झाल्याचा दाखला महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांचे मार्फत प्रवेश व पात्रता विभागाकडे सादर करावेत.

तरी, उपरोक्त सुधारीत बदलाची नोंद घेऊन सदरची बाब आपल्या महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा / विभागांमध्ये मधील विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि अधिनस्थ अध्यापक, कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**

प्रवेश, पात्रता आणि अभ्यास मंडळ विभाग

**प्रत माहितीसाठी :-**

१.मा.प्रभारी कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

२.मा. प्रभारी प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

३.मा. प्रभारी कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

४.मा.प्रभारी संचालक कार्यालय, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

५.मा. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

६.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.